दिनांक १५/०९/२०१७

# प्रेस नोट

'रेयान इन्टरनॅशनल स्कूल' मध्ये इयत्ता २ री च्या वर्गात शिकणारा ७ वर्षीय विद्यार्थी प्रदयुम्न याची हत्या करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत सर्व संबंधीतांशी संवाद साधण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर श्रीमती रश्मि शुक्ला यांनी पुण्यातील १ ली ते १२ वी पर्यंतच्या शाळा - महाविद्यालयांचे मुख्याध्यापक व प्राचार्य यांची बैठक दि. १९/०९/२०१७ रोजी १६.०० वा नेहरू मेमोरीयल हॉल, दोराबजी शॉपींग सेंटर समोर, कॅम्प, पुणे येथे आयोजित केली आहे.

सदर बैठकीत शाळा व महाविद्यालयातील मुलामुलींच्या सुरक्षिततेबाबत करावयाच्या उपाययोजना व केलेल्या व्यवस्थेचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच पुणे शहर पोलीसांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरू केलेल्या 'पोलीस काका' उपक्रमाबाबत व त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता चर्चा करून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पुणे शहरातील शाळा महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य यांना सदर बैठकीसाठी उपस्थीत रहाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.